लोकमत

# 'खंडेलवाल'चे ५ विद्यार्थी राज्यपालांच्या हस्ते सन्मानित



लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला :** शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या ५ विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते 'सायबर सुरक्षेकरिता सायबर शिक्षण' याबाबत राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे येथे आयोजित या समारंभात त्यांना सन्मानित करण्यात आले.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या अभियानांतर्गत या वर्षी शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या वीस विद्यार्थ्यांनी अकोला, अमरावती, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यांमध्ये शाळा, महाविद्यालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणी जाऊन कार्यशाळा घेत जनजागृती केली. यामध्ये नऊ हजार विद्यार्थी आणि जनतेला सायबर सुरक्षेसाठी अवगत केले. या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून राष्ट्रीय स्तरावरील ५ पुरस्कार महाविद्यालयाला प्रदान करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट शिक्षक उपविजेता पुरस्कार डॉ.हरिदास खरात, सर्वोत्कृष्ट टीम विजेता पुरस्कार अनिकेत बुडके आणि सुमित सपकाळ, सर्वोत्कृष्ट पी.आर. मीडिया डायरेक्टर उपविजेता पुरस्कार वैष्णवी बेलांगे व सर्वोत्कृष्ट कम्युनिटी डायरेक्टर विजेता प्रणाली पिंपळकर यांना प्रदान करण्यात आला. शीतल साखरे हिला क्रिएटिव्ह टीम सदस्य म्हणून प्रमाणपत्र मिळाले.